दैनिक
# महावृत्त

ई – मेल dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते.मो.९४२१०९४९९१,७२६४०७९९९०

लातूर वर्ष ३ रे अंक १०० वा गुरूवार दि.३१ ऑगस्ट २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




# महाराष्ट्र, केरळात पावसाची मोठी तूट
## दुष्काळाचे सावट, देशात सरासरी ९१ टक्के पाऊस



नवी दिल्ली : वृत्तसंस्था–देशातील काही भागांत सध्या चांगला पाऊस झाला तर काही भागांत अद्या–पही पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार १ जूनपासून आतापर्यंत देशात सरासरीच्या ९१ टक्के पाऊस झाला आहे. दरवर्षी ३० ऑगस्टपर्यंत देशात ६८७ मिमी सर्वसाधारणपणे पाऊस होत असतो. यावर्षी मात्र प्रत्यक्षात ६२७ मिमी पावसा–ची नोंद झाली, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली. केरळसह महाराष्ट्रात पावसाची मोठी तूट असल्याची माहिती हवामान विभागाने दिली.

हवामान विभागाने देशात आतापर्यंत झालेल्या पा–वसाची माहिती दिली. देशात सरासरीच्या ९ टक्के पाऊस कमी झाला. आतापर्यंत देशात ९१ टक्के पाऊस झाला. यामध्ये केरळमध्ये यावर्षी पावसाची मोठी तूट पाहायला मिळत आहे. जूनपासून केरळात सरासरीच्या ४८ टक्के पावसाची तूट झाली आहे. मध्य महाराष्ट्रात सरासरीच्या २२ टक्के पावसाची तूट झाल्याचे पाहायला मिळत आहे. मराठवाड्यात देखील १ जूनपासून सरासरीच्या १९ टक्के पावसाची तूट झाली आहे, अशी माहिती हवामान खात्याने दिली.

संपूर्ण महाराष्ट्रात उणे ५८ टक्के तूट

ऑगस्ट महिन्याचा विचार केला तर राज्यात सरासरीच्या उणे ५८ टक्के तूट निर्माण झाली आहे. कारण ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या फक्त ४२ टक्के पाऊस झाला आहे.

मराठवाड्यात विदारक स्थिती

पावसाने पाठ फिरवल्याने मराठवाड्यात विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण तिथे सरासरीच्या केवळ २८ टक्के पाऊस झाला आहे. त्याखालोखाल मध्य महाराष्ट्र आणि कोकणात केवळ ३६ टक्के पाऊस पडला. राज्यातील १५ जिल्ह्यात पावसाच्या सरासरीतली तूट मोठी आहे. या मोठ्या तुटीमुळे आणि पुढचे काही दिवस पा–वसाची शक्यता नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

## भीमा–कोरेगाव दंगलीत प्रशासनाची भूमिका संशयास्पद

पुणे : १ जानेवारी २०१८ रोजी पुणे जिल्ह्यातील भीमा–कोरेगाव येथे विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी आलेल्या आंबेडकरी समाजावर समाजकंटकांनी हल्ला घडवून आणला होता. यामध्ये प्रशासनामधील लोकांनी जाणीवपूर्वक वरपर्यंत माहिती पोहोचू दिली नाही, असा गंभीर आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

या दंगल प्रकरणी नेमलेल्या चौकशी आयोगापुढे आज त्यांची तब्बल २ तास साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना सविस्तर तपशील दिला.

आंबेडकर म्हणाले, भीमा–कोरेगाव दंगलीत संभाजी भिडे यांचा सहभाग असल्याचे पुण्याच्या पोलिस अधीक्षकांनी म्हटले आहे. याची याचिका सुप्रीम कोर्टात दाखल आहे. प्रश्न हा आहे की, २८, २९, ३० डिसेंबर २०१७ रोजी पुणे जिल्ह्याच्या २० कि.मी.च्या अंतरावरील लोकांना सांगलीहून ज्यांचे ज्यांचे फोनकॉल आले त्यांची चौकशी झाली पाहिजे.

हे फोन कोणत्या क्रमांकावरून आले, त्यांची संघटना कुठली होती? सांगली जिल्ह्यातून पुण्यात २८, २९, ३० डिसेंबर २०१७ रोजी कोण कोण आले? त्यांनी भीमा–कोरेगावला भेट दिली होती का? त्यांची ओळख काय? या गोष्टी आयोगाने तपासल्या पाहिजेत.

प्रतिज्ञापत्रातून महत्त्वाचा भाग वगळला

चौकशी आयोगापुढे पोलिसांनी दिलेले प्रतिज्ञापत्र आले आहे. यामध्ये भीमा–कोरेगावसह परिसरातील गावांच्या ग्रामपंचायतींनी कुठले ठराव केले होते त्याचा उल्लेख या प्रतिज्ञापत्रातून वगळलेला आहे. ही दंगल घडवण्यात आली आहे कारण व्हॉट्सअॅपमधील चॅट्स, एकमेकांबद्दलची माहिती ही सर्व कागदपत्रे कमिशनसमोर सादर करण्यात आली आहेत.

## पंकजा मुंडेंच्या ‘शिवशक्ती’ यात्रेला सुरुवात

मुंबई : दोन महिन्यांचा राजकीय ब्रेक घेणा–या पंकजा मुंडे पुन्हा एकदा सक्रिय झाल्या आहेत. मात्र, या वेळी त्यांनी राज्यात शिवशक्ती यात्रा काढत धार्मिक स्थळांना भेटी देण्याची तयारी केली आहे. या यात्रेच्या पहिल्याच दिवशी पंकजा मुंडे यांनी श्री–क्षेत्र माहूर गडावरील रेणुका मातेचे दर्शन घेतले. या दरम्यान त्या नांदेड विमानतळावरून माहूरला रस्ते मार्गाने पोहोचल्या. मार्गात त्यांचे ठिकठिकाणी स्व–ागत करण्यात आले.

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी प्रत्यक्ष राजकीय घडामोडींमध्ये सहभागी न होता, शिवशक्ती यात्रेच्या माध्यमातून लोकांना भेटणार असल्याचे जाहीर केले आहे. राज्यभरात अकरा दिवसांच्या या दौ–यात त्या दहा जिल्ह्यांतील त्यांच्या कार्यकर्त्यांची भेट घेणार आहेत.

विधानसभा निवडणुकीनंतर अडगळीत टाकल्याची भावना पंकजा मुंडे यांच्या मनात असल्याची चर्चा आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी अनेकदा नाराजी देखील व्यक्त केली होती. आपण या संदर्भात केंद्रीय नेतृत्वाकडे तक्रार करणार असल्याचेही त्यांनी म्हटले होते. तरी देखील भाजपमध्ये कोणतीच हालचाल न झाल्याने अखेर दोन महिन्यांचा ब्रेक घेत त्यांनी चर्चा कमी करण्याचा प्रयत्न केला होता.

आता मात्र, शिवशक्ती यात्रेच्या माध्यमातून आपण जनतेच्या संपर्कात राहणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## रक्षाबंधनच्या पूर्वसंध्येला जिल्हाधिकारी यांनी बांधली झाडाला राखी; वृक्ष संवर्धनाचे केले आवाहन






लातूर दि. ३० ( जिमाका ) रक्षाबंधन हा सण देशभरात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. बहिणीच्या रक्षेसाठी भाऊ पाठीशी असावा म्हणून बहिणी भावाला राखी बांधते अशी या सणाची परंपरा आहे. आपण वृक्षारोपण करतो पण वृक्षाचे संवर्धन म्हणावं तेवढे करत नाही. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी वृक्षालाच राखी बांधून वृक्षाचे संवर्धन करण्याचा संदेश जिल्ह्यातील नागरिकांना दिला. रक्षाबंधनच्या पूर्वसंध्येला पिंपळाच्या झाडाला राखी बांधून वसुंधरा प्रतिष्ठानच्या उपक्रमात जिल्हाधिकारी यांनी सहभाग नोंदवत उत्साह वाढविला.

मानव आणि निसर्ग यांच्यातील नात दृढ होण्यासाठी असे उपक्रम काळाची गरज असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी म्हणाल्या.

राज्यात वनाच्छादित क्षेत्र अत्यल्प असलेल्या जिल्ह्यात लातूर जिल्ह्याचा क्रमांक लागतो.अधिकाधिक वृक्षारोपण करून आणि विशेषतः त्याचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. जिल्ह्या–तील सर्वसामान्यापर्यंत वृक्ष लागवड आणि त्याचे संवर्धन करण्याची चळवळ निर्माण व्हावी यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्न करत आहे. जिल्हाधिकारी आणि विविध विभागाचे अधिकारी वृक्षारोपण मोहिमेत सहभागी होऊन वृक्ष संवर्धनाचे महत्व सर्वसामान्यांपर्यंत जावे यासाठी प्रयत्न करत आहेत.

वसुंधरा प्रतिष्ठानच्या वृक्षाला राखी बांधण्याच्या कार्यक्रमाला यावेळी उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, वसुंधरा प्रतिष्ठानचे प्रा.योगेश शर्मा, अमोलआप्पा स्वामी, डॉ. अजित चिखलीकर, उमेशआप्पा ब्याकोडे, किसन फुलमाळी, प्रिया मस्के, सुनैना नायब, श्रद्धा मोरे आदींची उपस्थिती होती.

## श्री केशवराज विद्यालयात कुस्ती प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन




लातूर/प्रतिनिधी: हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय क्रीडादिनी श्री केशवराज विद्यालयात कुस्ती प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन संपन्न झाले.

स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर तसेच शालेय समिती सदस्य नरेंद्र पाठक,विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप कुलकर्णी,
उपमुख्याध्यापक तथा विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे,पर्यवेक्षक दिलीप चव्हाण,क्रीडाशिक्षक प्रयागराज गरूड,गुरुनाथ झुंजारे,अमृत बिराजदार , प्रल्हाद माले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# लातूरची विमानसेवा लवकर सुरू होणार !
## जमिनीचे अधिग्रहण करून विमानतळाची उर्वरित कामे त्वरित पूर्ण करणार



लातूर (प्रतिनिधी): लातूरच्या औद्योगिक, शैक्षणिक, कृषी विकासासाठी अत्यावश्यक असलेली लातूरची विमानसेवा पुन्हा सुरू करण्यासाठी एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडियाची परवानगी मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या जमिनीचे अधिग्रहण करून विमानतळावरील उर्वरित कामे त्वरित पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना दिले.

लातूर एमआयडीसी विस्तारासाठी जमिनीचे अधिग्रहण, एमआयडीसी अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती, उद्योगांसाठी पाणीपुरवठा त्याचबरोबर लातूर विमानतळावरील विमानसेवा पुन्हा सुरू करण्याच्या मागणीसाठी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवारी सायंकाळी राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

लातूर जिल्हा महाराष्ट्रातील एक शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून अत्यंत गतीने विकसित होत आहे. येथील कृषी मालाची बाजारपेठ राज्यातील एक नामवंत बाजारपेठ म्हणून ओळख निर्माण करीत आहे. त्यामुळे या शहराच्या आणि जिल्ह्याच्या एकूण विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी येथील विमानतळावरून नियमित विमानसेवा सुरू होणे आवश्यक आहे. लातूरच्या विमानतळावरील विमान सेवेला एअरपोर्ट अथोरिटी ऑफ इंडिया ची पुन्हा परवानगी मिळण्यासाठी या विमानतळाच्या संरक्षण भिंतीचे काम पूर्ण होणे आवश्यक आहे. नऊ हेक्टर जमिनीचे अधिकरण केल्यानंतरच या संरक्षण भिंतीचे काम पूर्ण होणार आहे त्यामुळे सदरील जमिनीचे अधिग्रहण सक्तीने करण्यात यावे अशी मागणी आज आमदार अमित देशमुख यांनी केली असता उद्योग मंत्री या जमीन अधिग्रहणास मंजुरी देत विमानतळावरील उर्वरित कामे त्वरित पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन दिले,

तिसऱ्या टप्प्यातील एमआयडीसी विस्तारासाठी जमिनीचे अधिग्रहण

नवीन उद्योग उभारणीसाठी जागेची उपलब्धता व्हावी म्हणून लातूर एमआयडीसी च्या तिसऱ्या टप्प्यातील विस्तारासाठी चाटा, भोयरा परिसरातील जमिनीचे आवश्यकतेनुसार अधिग्रहण करण्यात येईल असे आश्वासनही उद्योग मंत्री उदय सामंत यांनी यावेळी दिले.

परतीच्या मान्सून नंतरच पाणी कपाती बाबतचा निर्णय

पावसाने उघडीप दिल्याने सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे, असे असले तरी लातूर व परिसरात परतीच्या मान्–सूनचा पाऊस चांगला पडतो असा आजवरचा अनुभव आहे त्यामुळे लातूर एमआयडीसीतील उद्योगांचा पाणीपुरवठ्याची कपात करण्यापूर्वी परतीच्या मान्सूनची वाट पहावी अशी विनंती आमदार अमित देशमुख यांनी यावेळी उद्योग मंत्री सामंत यांच्याकडे केली या मागणीलाही त्यांनी अनुकूल प्रतिसाद दिला,

कमी पाणी लागणाऱ्या उद्योगांना लातूर एमआयडीसीत प्राधान्य द्यावे

लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी येथे नवनवीन उद्योग उभारणीला चालना देणे आवश्यक आहे, येथील नैसर्गिक परिस्थिती लक्षात घेता लातूर , उस्मानाबाद बीड या या जिल्ह्यांमध्ये कमी पाण्यावर चालणारे उद्योग उभारणीसाठी प्रोत्साहन द्यावे, वैद्यकीय क्षेत्रात लागणारी मशनरी व अवजारे तयार करणारी कारखानदारी येथे प्राधान्याने उभारण्यात यावी अशी मागणी आमदार देशमुख यांनी केले असता उद्योगमंत्री सामंत यांनी या संकल्पनेचे स्वागत केले,

रस्ते दुरुस्तीसाठी निधी द्यावा

. लातूर एमआयडीसीतील अंतर्गत रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे त्यामुळे या रस्त्यांचे दुरुस्तीची मोहीम हाती घ्यावी लागणार आहे त्यासाठी आवश्यक असणारा निधी मंजूर करावा अशी विनंती आमदार देशमुख यांनी उद्योग मंत्री सामंत यांना दिलेल्या निवेदनात केलेली आहे,

उद्योग वाढीसाठी सकारात्मक चर्चा

उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासोबत झालेली चर्चा खूपच सकारात्मक राहिली, त्यांनी लातूरसह उस्मानाबाद, बीड या जिल्ह्यातील औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी दिले असल्याचे आमदार अमित देशमुख यांनी म्हंटले आहे.

# संपादकीय....

## धीरूभाईंच्या तिसऱ्या पिढीकडे रिलायन्सची सूत्रे

'करलो दुनिया मुठी में', असे रिलायन्स समूहाचे एक ब्रीदवाक्य आहे. सर्वसामान्य कुटुंबात जन्माला येऊनसुद्धा आपल्या ध्येयचिकाटीने देशातील उद्योगक्षेत्रात स्वत:ची वेगळी छाप निर्माण करणाऱ्या रिलायन्स समूहाच्या तिसऱ्या पिढीकडे आता उद्योग व्यवसाय वाढविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. धीरूभाईंचे मोठे पुत्र मुकेश अंबानी यांनी कंपनीच्या संचालक मंडळातून पायउतार होणार असल्याची माहिती देतानाच त्यांची मुले – ईशा, आकाश आणि अनंत अंबानी यांचा कंपनीच्या कार्यकारी संचालक मंडळात समावेश करण्यात आल्याची घोषणा केली. या खास क्षणी मुकेश अंबानी भावुक झाले होते. यावेळी त्यांना १९७७ मध्ये जेव्हा ते बोर्डात सामील झाले त्या दिवसाची आठवण झाली. जेव्हा माझ्या वडिलांनी मला रिलायन्सच्या संचालक मंडळात समाविष्ट केले होते, तेव्हा मी फक्त २० वर्षांचा होतो. आज ईशा, आकाश आणि अनंतमध्ये मला, मी आणि माझे वडील दिसत आहेत. या सर्वांमध्ये मला धीरूभाईंची ज्योत दिसते. माझ्या तीन मुलांनी धीरूभाईंची मानसिकता आत्मसात केली आहे आणि धीरूभाईंच्या उद्देश, तत्त्वज्ञान, उत्कटता आणि पायनियरिंग स्पिरिटसाठी ते वचनबद्ध आहेत, असे त्यांनी बोलून दाखवले.

धीरूभाई अंबानी यांनी आपल्या कष्टाने रिलायन्स उभी केली असली तरी मुकेश अंबानींच्या योगदानाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. २००२ मध्ये उद्योगपती–वडील धीरूभाई अंबानी यांच्या आकस्मिक निधनानंतर रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सूत्रे हाती घेणारे मुकेश अंबानी यांना २१ वर्षे पूर्ण झाली आणि या काळात कंपनीच्या महसुलात वाढ झाली, तर नफा २० पटीने वाढला. आज रिलायन्स इंडस्ट्रीज केवळ पेट्रोलियमच्या जगातच नाही तर डिजिटल, मोबाइल, रिटेल आणि ग्रीन एनर्जीमध्येही आपले पाय पसरविले आहेत. त्याचे श्रेय मुकेश अंबानींना जाते. मुकेश अंबानी त्यांच्या कार्यकर्तृत्वाने रिलायन्सचा व्यवसाय सतत वाढवला. टेलिकम्युनिकेशनसोबतच रिलायन्स जिओमार्टच्या माध्यमातून रिटेल व्यवसायात वेगाने वर्चस्व निर्माण केले. रिलायन्सच्या जिओ प्लॅटफॉर्मवर जगातील मोठ्या कंपन्यांनी गुंतवणूक केली असून रिलायन्स आज पूर्णपणे कर्जमुक्त कंपनी आहे.

मागील दोन दशकांमध्ये रिलायन्सने अनेक नवीन व्यवसाय सुरू केल्याचे आपल्या पाहण्यात येतात. ज्यात रिलायन्सने २०१६ मध्ये जिओ सुरू केला आणि दोन वर्षांत ती भारतातील टॉप तीन कंपन्यांपैकी एक बनली. मुकेश यांनी सूत्रे हाती घेतल्यावर रिलायन्सने २००६ मध्ये रिटेलमध्ये आणि २०२१ मध्ये नवीन ऊर्जा सुरू केली. रिलायन्स इंडस्ट्रीजने तेल शुद्धीकरणाची क्षमता दुप्पट केली आणि सर्वात वाईट कच्च्या तेलाचे निर्यातक्षम इंधनात रूपांतर करण्याची एक अद्वितीय क्षमता जोडली. यात जगातील काही सर्वात मोठी डाऊनस्ट्रीम युनिट्स देखील जोडली गेली. यादरम्यान रिलायन्सचा पेट्रोकेमिकल्सचा पारंपरिक व्यवसायही गेल्या दोन दशकांत अनेक पटींनी वाढला. याशिवाय त्यांच्या नेतृत्वाखाली फेसबुक, गुगल आणि बीपीसारख्या कंपन्यांनी रिलायन्समध्ये गुंतवणूक केली आहे. तेलापासून सुरुवात करून कंपनीने आजच्या काळात दूरसंचार आणि रिटेल क्षेत्रात प्रवेश केला आहे.

मुकेश अंबानी हे पहिले व्यक्ती आहेत ज्यांनी डेटाला 'न्यू–ऑइल' म्हटले आहे. ते इंधन तुमच्या आयुष्यात किती प्रमाणात शिरले आहे, हे आज आपण सर्वजण पाहत आहोत. मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखाली रिलायन्स जिओने देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठ्या टेलिकॉम कंपन्यांमध्ये स्थान मिळवले आहे. जिओने डेटा क्षेत्रात मोठी क्रांती आणली असून पूर्वी २५० रुपये प्रति जीबी दराने मिळणारा डेटा आता १० रुपयांवर आला आहे. फक्त किंमतच कमी झाली नाही, तर डेटा वापरातही वाढ झाली आहे आणि यात जिओचे मोठे योगदान आहे. त्यामुळे देश–विदेशात मुकेश अंबानी यांना कोणत्याही ओळखीची गरज नाही, असे वलय त्यांनी स्वत:च्या नावाभोवती केले आहे.

धीरूभाई अंबानी हयात असताना मुकेश अंबानी आणि अनिल अंबानी या भावांमध्ये जीवापाड प्रेम होते. ६ जुलै २००२ रोजी धीरूभाईंचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्यानंतर दोन्ही भावांमध्ये वाद सुरू झाला. त्याचे कारण धीरूभाई यांनी आपल्या मागे कोणतेही मृत्यूपत्र ठेवले नव्हते. मात्र आई कोकिलाबेन अंबानी यांनी दोन्ही भावांमध्ये व्यवसायाची वाटणी करून वाद मिटविला होता. संपत्ती वाटपात मोठा मुलगा मुकेशच्या पदरी पेट्रोकेमिकल्स, रिफायनिंग आणि टेक्स्टाईलसह तेल आणि वायू व्यवसाय आला, तर अनिल अंबानी यांना आर्थिक सेवा, ऊर्जा, मनोरंजन आणि दूरसंचार व्यवसायांची जबाबदारी देण्यात आली. मागील २१ वर्षांपासून मुकेश यशस्वीपणे रिलायन्सची सूत्रे सांभाळत आहेत.

मात्र जेव्हा वाटणी झाली, तेव्हा अधिक फायदेशीर असलेले व्यवसाय अनिल अंबानींना देण्यात आले होते. तरीही आज व्यावसायिक जगतात काहीतरी नवीन करण्याची जिद्द आणि कार्यक्षमता यामुळे मुकेश अंबानी यांनी आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून स्वत:ला सिद्ध केले आहे. २०१६ पर्यंत अंबानी ३८व्या क्रमांकावर होते आणि गेल्या दहा वर्षांपासून फोर्ब्स मॅगझिनच्या यादीत त्यांनी भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून स्थान मिळवले आहे. फोर्ब्सच्या जगातील सर्वात शक्तिशाली लोकांच्या यादीत ते एकमात्र भारतीय उद्योजक आहेत. जानेवारी २०१८ पर्यंत, मुकेश अंबानी यांना फोर्ब्सने जगातील १८व्या क्रमांकाची सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून स्थान दिले. मालमत्तेवरून भविष्यात अंबानी परिवारात वाद होऊ नये यासाठी मुकेश अंबानी यांनी विशेष काळजी घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांनी कंपनीची सूत्रे तीन मुलांकडे सोपवली आहेत.

# सुशिक्षित महिला आणि अशिक्षित सासर

अजून एक समस्या सीमासमोर होती, ती म्हणजे तिचं राहणीमान, कपडे, फॅशन, ब्युटी पार्लरला जाणं हे घरातील सासू, मोठी जाऊ आणि नणंदेला पसंत नव्हतं. त्यांचं म्हणणं आम्ही कधी आयुष्यात असा वायफळ खर्च केला नाही, तोंडं रंगवली नाहीत, तुला बरं सुचतं हे सगळं. सीमाच्या सांगण्यानुसार तिला बाहेरच्या जगात वावरताना, चार चांगल्या लोकांमध्ये मिसाळताना निटनिटकं राहणं गरजेचे होतं. घरातील इतर महिलांना कधीही मोठे कार्यक्रम, मोठ्या मीटिंग, सभा, संमेलन इत्यादी ठिकाणी जाण्याची वेळच आली नाहीये. त्यामुळे त्यांना ब्युटी पार्लरला का जायचं याचं महत्त्वच पटत नाही. बाहेर वावरताना टापटीप का राहावं लागतं, कपड्यांना इस्त्री का असावी लागते, प्रसंगानुसार कपडे, स्टाईल थोडीफार फॅशन बदलावी लागते हे घरात कोणीही समजावून घेत नाही. रोजच साडी, मोठं मंगळसूत्र, हातभर बांगड्या आणि मोठी टिकली लावून मी सगळ्याच ठिकाणी नाही जाऊ शकत. पण सासू मात्र अपेक्षा करते की सीमाने रोज कायमस्वरूपी घरात आणि बाहेर देखील अशाच प्रकारे राहावं.

प्रत्येक घरातील गृहिणी जशी सर्व सौभाग्य अलंकार परिधान करते तसेच सीमाने वागावं. सीमाचं म्हणणं होतं मला टू व्हिलर चालवताना, बसने, ट्रेनने कामानिमित्त बाहेरगावी प्रवास करताना, धावपळ करताना आरामदायक कपडे बरे वाटतात. सासू म्हणते, आम्ही नववारी साडी घालून पण प्रवास केलेत आणि भाकऱ्या थापल्यात, शेतातील कामं पण साड्या घालूनच केलीत. तुझं भलतंच कौतुक आहे. सीमाला हे सगळं ॲडजेस्ट करणं अशक्य वाटतं होतं कारण आताच्या काळात, तिचं व्यावसायिक स्वरूप लक्षात घेता तिला असं राहणं आणि वावरणं अजिबात सूट होणारं नव्हतं.

कविता (काल्पनिक नाव) पण शिकलेली. गृहिणी म्हणून राहणारी, तीस वर्षीय महिला. कविताला होत असलेला एक मानसिक त्रासाचा मुद्दा होता तिचं आणि तिच्या नवऱ्याचं बाहेर फिरायला जाणं, हॉटेलिंग करणं तिच्या सासूला अजिबात पसंत नसायचं. सासू स्वतःच्या मुलाला याबाबत काही बोलायची नाही. पण कविताला मात्र तुझ्या मौज–मजेवर, तुझ्या बाहेर खाण्यावर किती पैसा खर्च होतो, तो जरी बाहेर जेवायला चल म्हटला तरी तुला नाही म्हणता येत नाही काय? सासूकडून अशी वक्तव्य ऐकल्यावर कविताला प्रचंड वाईट वाटायचं कारण ती पण चांगल्या घरातील मुलगी होती आणि तिच्या खाण्या–पिण्याच्या खर्चावरून तिला बोलणं तिच्यासाठी खूप अपमानास्पद होतं. घरात पण कविताने काही वेगळा, नवीन, चांगला पदार्थ बनवायला घेतला किंवा बाहेरून काही पार्सल मागवले की, काय चोचले चाललेत खाण्याचे म्हणून तिला सासूमार्फत ऐकवणूक केली जायची.

अशीच परिस्थिती होती राणी (काल्पनिक नाव)ची. इंजिनीरिंगची डिग्री घेतलेली राणी जेव्हा लग्नानंतर सासरी गेली, नोकरीला सुद्धा लागली तेव्हा सासरच्या लोकांनी मुद्दाम कामवाली काढून टाकली, असं तिचं म्हणणं होतं. अतिशय अशिक्षित सासू आणि अडाणी नणंद आहे त्यामुळे माझ्याशी असं वागल्या असं तिचं मत झालं होतं. आम्हाला तुझ्या करिअर वगैरेंचे काही कौतुक नाही, घरातली सगळी कामं करून जे करायचं ते कर असं तिला सांगण्यात आले होते आणि हे सगळं करताना



तिची खूप दमछाक होऊ लागली. दोन्ही आघाड्या सांभाळून जगणं तिच्या तब्बेतीला मानवणारं नव्हतं. नवऱ्यापुढे हा विषय मांडला असता, तो म्हणाला जमत नसेल तुला तर नोकरी सोडून दे, पण माझ्या आईने आयुष्यभर खूप कष्ट केलेत, तिला आता काम होत नाही, ती काहीही मदत करणार नाही. कामवाली फक्त माझं लग्न होईपर्यंत एक सोय म्हणून ठेवली होती. आता तू आहेस ना मग कामवालीची गरज नाही. राणीचं म्हणणं होतं मी अतिशय उत्कृष्ट गुण मिळवून उत्तम कॉलेजमधून इंजिनीअर झाले ते घरकाम करण्यासाठी नाही. माझ्या पालकांनी लाखो रुपये खर्च करून मला स्वतःच्या पायावर उभ केलं आहे, मला करिअर महत्त्वाचे आहे. त्यामुळे मला आता या लग्नात जमवून घेणं अशक्य आहे.

नंदा (काल्पनिक नाव) सामाजिक कार्यात अत्यंत रस असलेली. समाजासाठी झटून काम करणारी उच्चशिक्षित विवाहित स्त्री. लहानपणापासून माहेरी सामाजिक वातावरण असल्यामुळे तिच्या रक्तातच सामाजिक बांधिलकी आहे. नंदाच्या लग्नाला सुद्धा दहा–बारा वर्षे झालीत. पण आता तिला घरातील मागासलेल्या मनोवृत्तीचा, कमकुवत बुद्धिमत्ता असलेल्या अडाणी, अशिक्षित, घटस्फोटित नणंदेचा आणि प्रचंड जुन्या विचारसरणीची सासू यांचा भयानक त्रास होऊ लागला आहे, असं ती सांगत होती. तिच्या सामाजिक कार्यक्रमांवर, तिच्या समाजातील, घराबाहेरील विविध उपक्रमांवर या दोघीही सतत टीका करत. लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यापेक्षा स्वतःचं बघ, स्वतःच्या नवऱ्याकडे लक्ष दे, तुझ्या बाहेर राहण्यामुळे तुझ्या मुलांची जबाबदारी आमच्यावर पडते, त्याला वळण लावणं तुझीच जबाबदारी आहे. स्वतःचा संसार वाऱ्यावर टाकून कशाला बोंबलत लोकांना मदत करत फिरते, सामाजिक कार्य फुकटात करून कोणाचं भलं झालंय, चार पैसे कामविण्याची अक्कल नाही, कशाला नवऱ्याच्या जीवावर समाजसेविका बनते अशी निंदा आणि असभ्य भाषा तिला सतत ऐकावी लागत होती.

जे सामाजिक कार्य तिचं स्वप्न आहे, तिला त्यातून पुढे मोठं व्यक्तिमत्त्व बनायची इच्छा आहे. तिथेच तिला कोणताही पाठिंबा अथवा प्रोत्साहन न देता या दोघी सतत टोचून बोलतात. यामुळे नंदासुद्धा वेगळं होण्याच्या विचारात होती. मला माझ्या कामावरून अपमानित केलेले अजिबात सहन होत नाही, होणार नाही यावर नंदा ठाम होती. यासारखी अनेक उदाहरणे आपल्याला समाजात दिसतात. ज्यामुळे चांगल्या शिकलेल्या महिलांना त्यांच्या बौद्धिक पातळीनुसार सासर न मिळाल्यामुळे, वैचारिक, भावनिक, मानसिक पातळीत खूप तफावत निर्माण होते आणि संसार मोडकळीस येत आहेत. फक्त पती–पत्नीचं सुशिक्षित, डिगऱ्या घेतलेले असून चालत नाही, तर संपूर्ण कुटुंब थोडेफार तरी शिकलेले असणे आज काळाची गरज बनत आहे.

जर तसं नसेल तर ज्यांना शिक्षणाची संधी मिळालेली नाही, जे जुन्या पिढीतील आहेत अथवा स्वतः अज्ञानामुळे शिक्षण सोडून दिलेले आहेत, परिस्थितीअभावी शिकू शकलेले नाहीत अथवा जे किमान पदवीधर पण झालेले नाहीत, अशा सासरच्या लोकांनी आपल्या उच्चशिक्षित सुनेसोबत जुळवून घेण्यासाठी आपली विचारसरणी, आपली वागणूक, आपले व्यक्तिमत्त्व, आपले स्वभाव बदलणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ आपल्या अडाणीपणामुळे, हेकेखोरपणामुळे, आपल्याला बाहेरील जगातील काहीही माहिती नसूनदेखील सुशिक्षित सुनांना केवळ मानसिक त्रास द्यायचा, कमी लेखायला म्हणून सासुरवास करायला जालं तर ऐका चांगल्या संसाराचा आपण स्वतः नाश करणार आहात हे लक्षात असू द्या

# एकमेकांवर चिखल फेक

अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष व काँग्रेसचे पंतप्रधानपदाचे अघोषित उमेदवार खासदार राहुल गांधी यांनी लडाखच्या भूमीवर चीनच्या सैन्याने ताबा घेतला असल्याचे भाष्य करून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहेच. पण आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची बदनामी करीत आहोत याचे भानही त्यांचे सुटले आहे. राहुल गांधी मोदींवर आरोप करताना ते संयम बाळगत नाहीत. राहुल यांच्या आरोपाने भारतीय सैन्य दलाच्या मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो. राष्ट्रीय सुरक्षा, एकता, अखंडता याला आपण छेद देणारे वक्तव्य करीत आहोत, याचाही त्यांना विसर पडलेला दिसतो. काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून पंतप्रधान मोदींना त्यांचा विरोध असणे समजू शकते. तो त्यांच्या राजकारणाचा भाग असू शकतो. पण मोदींना विरोध करताना देशाची मान खाली जाईल, अशी वक्तव्ये करणे हे राजकीय अपरिपक्वतेचे लक्षण आहे. राहुल तरुण असले तरी त्यांचेही वय वाढत चालले आहे. राहुल गांधी जबाबदार व सशक्त नेता कधी बनणार, असा प्रश्न राजकीय वर्तुळात विचारला जातो आहे.

लडाखच्या जमिनीवर चिनी सैन्याने कब्जा केला आहे, असा राहुल गांधी यांनी जो दावा केला आहे, तो घाईघाईत केलेला दिसतो, एवढेच नव्हे तर कोणताही विचार न करता केलेला आहे, असे म्हणावे लागते. चीनने भारताचा हिस्सा असलेल्या लडाखच्या भूमीवर कब्जा केला हे त्यांना कसे कळले, त्याचा स्त्रोत काय आहे, त्यांना ही कोणी माहिती दिली? राहुल यांचा पंतप्रधानांवर विश्वास नाही, देशाच्या संरक्षण मंत्र्यांवर विश्वास नाही किंवा परराष्ट्र मंत्र्यांवरही विश्वास दिसत नाही. भारतीय सैन्य दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर किंवा निवृत्त वरिष्ठांवर त्यांचा विश्वास नाही हेच त्यांच्या वक्तव्यातून जाणवते.

दक्षिण ऑफ्रिकेत पंतप्रधान नरेंद्र मोदी व चीनचे अध्यक्ष झिंग जीपिंग हे एकमेकांना भेटत असताना राहुल यांनी चीनने लडाखची हजारो किमी भूमी बळकावली, असा आरोप करीत होते. यामागे त्यांचे काही निश्चितच गणित असावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीरपणे सांगतात की, भारताची एक इंचही जमीन कोणीही घेतलेली नाही. सन २०२० मध्ये झालेल्या गलवान धुमश्चक्रीनंतर पंतप्रधानांनी बोलाविलेल्या सर्वपक्षीय बैठकीत, भारताची एक इंचही जमीन कोणीही घेतली नसल्याचे म्हटले होते. पण पंतप्रधान खोटे बोलतात, असा आरोप राहुल गांधी करतात, हे जास्त गंभीर व देशाला धोकादायक आहे. भारतीय सैन्याने कठोर प्रतिकार केल्यामुळे व दाखविलेल्या शौर्यामुळेच गलवान खोऱ्यातून चिनी सैन्याला माघार घ्यावी लागली, असे भाजपचे प्रवक्ते रवि शंकर प्रसाद यांनी त्याच वेळी स्पष्ट केले होते. तरीही चीनने भारताची भूमी बळकावली, असा अपप्रचार राहुल यांनी चालूच ठेवला आहे.

भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानव्याप्त काश्मीरवर सर्जिकल स्ट्राइक केला किंवा हवाई हल्ले केले होते, तेव्हाही त्यांनी प्रश्न उपस्थित करून पुरावे मागितले होते. भारतीय सैन्य दलाने केलेल्या कारवाईचे पुरावे मागणे म्हणजे त्यांच्या बेजबाबदारपणाचे वर्तन आहे. काँग्रेस पक्षातील ते आज सर्वोच्च नेते आहेत. त्यांनी संरक्षण किंवा परराष्ट्रविषयक मुद्द्यावर बोलताना अतिशय सावधपणे बोलणे अपेक्षित आहे. पण लडाखच्या भूमीवर चीनचा कब्जा, असा आरोप करणे म्हणजे निव्वळ उथळपणा आहे. भारताच्या सरहद्दीवर असलेली चीन व पाकिस्तान ही भारताची शत्रू राष्ट्रे आहेत. भारताच्या विरोधात त्या देशांना मदत होईल किंवा त्यांची प्रशंसा होईल, असे बोलणे कोणत्याही भारतीय नेत्याला शोभादायक नाही. चीनचा जो अजेंडा आहे, त्याला




पूरक अशी वक्तव्ये करणे देशाला धोकादायक आहे, याचे भान राहुल यांनी ठेवले पाहिजे. डोकलामचा वाद चालू असताना राहुल गांधी हे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाला न कळवता चिनी राजदूताला जाऊन भेटले होते. जेव्हा त्यांच्या मुलाखतीची जाहीर वाच्यता झाली, तेव्हा आपण वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी चिनी राजदूतांना भेटलो, असा खुलासा त्यांनी केला होता. देशाच्या सरहद्दीवर काय घडले, याची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी शत्रू राष्ट्राच्या राजदूताला भेटणे यापेक्षा बेजबाबदार वर्तन कोणते असू शकते?

काँग्रेस आज केंद्रात विरोधी पक्ष आहे. केवळ चार राज्यांत या पक्षाची सत्ता आहे. लोकसभेत विरोधी पक्ष म्हणून या पक्षाला अधिकृत मान्यता मिळविण्याइतपतही खासदार नाहीत. राज्यसभेत मात्र हा पक्ष मान्यताप्राप्त विरोधी पक्ष आहे. मग या पक्षाच्या सर्वोच्च नेत्याने जबाबदारीने बोलायला नको का? भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवर अडचण होईल असे प्रश्न विचारून किंवा आरोप करून राहुल गांधी यांना काय साध्य करायचे आहे? राहुल गांधी यांना चीनला सहानुभूती मिळावी असे वाटते का? राजीव गांधी फाऊंडेशनला चीनकडून देणगी मिळविण्याची खरोखरच गरज पडली होती का? सन २००८ मध्ये बिजिंग दौऱ्यावर असताना सोनिया गांधी व राहुल गांधी यांनी तेथे कम्युनिस्ट पक्षाबरोबर काय चर्चा केली? कोणते समझोते केले हे देशाला समजेल का?

जवाहरलाल नेहरू यांच्या पंतप्रधापदाच्या कारकिर्दीत चीनने तिबेटवर कब्जा केला आणि १९६२ ला भारतावर युद्ध लादून भारताचे मोठे नुकसान केले, याचा राहुल गांधी यांना विसर पडला का? नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाल्यापासून चीनलाच काय पण कोणत्याही देशाला भारताकडे वाकड्या नजरने बघण्याची हिम्मत झालेली नाही. चीनला वेळोवेळी त्याची जागा दाखवून देण्याचे काम भारताने केले आहे. एकीकडे नरेंद्र मोदी यांची जगात विश्वनेता म्हणून प्रतिमा निर्माण झाली असताना व ते ब्रिक्स परिषदेत चीनच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर चर्चा करीत असताना चीनने भारताच्या लडाख प्रांताची जमीन हडप केली, अशी आवई राहुल यांनी उठवणे यामागे त्यांची व काँग्रेस पक्षाची कोणती कुटनिती आहे? देशाची जनता नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यातील फरक चांगला जाणून आहे. चीन किंवा पाकिस्तानला ऊर्जा मिळेल अशी वक्तव्ये करून मोदींना प्रश्न विचारणे किंवा आरोप करणे वा पुरावे मागणे यातून देशाची बदनामी होत असते हे राहुल यांना समजत नसावे का? गलवान खोऱ्यात भारतीय सैन्य व चिनी सैनिकांत झालेल्या धुमश्चक्रीबाबत राहुल यांनी ज्या पद्धतीने प्रश्न विचारले ते आपल्या सैन्याच्या शौर्यावर आणि बलिदानावर संशय घेणारे होते.

आंतरराष्ट्रीय प्रश्न पंतप्रधान मोदींनी अत्यंत मुत्सद्दीपणे हाताळले आहेत. दुसरीकडे राहुल गांधी यांचा त्यात उथळपणा जगापुढे प्रदर्शित झाला आहे. राहुल गांधी यांच्या मनात मोदी, अमित शहा, भाजप, संघ परिवार यांच्याविषयी द्वेष आहे. त्यांच्या आरोपातून आणि वक्तव्यातून तो वेळोवेळी प्रकट होतो आहे. राहुल यांच्या आरोपांनी मोदी यांच्या जागतिक प्रतिमेवर काहीही परिणाम होणार नाही, उलट ते किती अपरिपक्व नेते आहेत, हेच जगापुढे येत आहे. राहुल गांधी आणि सोनिया गांधी हे पक्षाच्या कोणत्याच पदांवर नाहीत. पण कोणतेही पद नसताना पक्ष संघटनेची सूत्रे ही त्यांच्या हाती आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे जरी असले तरी सोनिया व राहुल यांनी हिरवा झेंडा दाखविल्याशिवाय ते कोणताच महत्त्वाचा निर्णय जाहीर करू शकत नाहीत. गांधी परिवाराशिवाय पक्ष चालू शकत नाही, ही काँग्रेस पक्षाची असहाय्यता आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार कमजोर व्हावे आणि मोदी यांच्या जागतिक प्रतिमेला तडे जावेत, असा काँग्रेसकडून वारंवार प्रयत्न होत असतो. पण त्यात काँग्रेस आणि राहुल गांधी हेच उघडे पडतात हे वेळोवेळी दिसून येते. मोदी सरकारने गेल्या साडेनऊ वर्षांत जे चांगले काम केले, ते काँग्रेसला दिसत नाही. देशात सर्वच वाईट चालले आहे, देशात सर्वत्र अंधार आहे, असे समजून काँग्रेस पक्ष नरेंद्र मोदींना, त्यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला व भाजपला विरोध करीत आहे.

# मुलांचा स्क्रीन टाईम किती हवा?



भारतातल्या माणसांचा सरासरी स्क्रीन टाईम जवळपास ७ तास १८ मिनिटे इतका आहे. यात सर्वप्रकारचे स्क्रीन्स आले. कोविडनंतर स्क्रीन टाइम किती हवा आणि किती स्क्रीन टाईम योग्य हे दोन्ही प्रश्न अतिशय अवघड होऊन बसले आहेत. मुलांचा स्क्रीन टाईम प्रचंड आहे हे आपल्या सगळ्यांना माहित आहे. भारतीय माणसाचा सरासरी स्क्रीन टाइम जरी ७ तासांचा असला तरी आजवरच्या माझ्या कामाच्या अनुभवातून माणसं झोपतात तेवढीच स्क्रीन पासून दूर असतात असं दिसून आलेलं आहे. मुळात मोबाईल, टीव्ही किंवा टॅबचा स्क्रीन कशासाठी वापरायचा आणि कशासाठी नाही याचा ताळमेळ अजू-नही आपल्याला घातला येत नाहीये. या सगळ्याचा विचार करेपर्यंत करोना महामारी आणि लॉकडाऊन येऊन आदळल्यामुळे त्या दोन वर्षांच्या काळात तर मोबाइलनेच आपल्याला विविध स्तरांवर तारलेलं आहे. पण आता जेव्हा आपण पूर्वीचे सुरळीत आयुष्य जगायला सुरुवात केलेली आहे तरीही कोव्हीड काळात जे बदल अपरिहार्यता म्हणून आपण स्वीकारले होते ते अजू-नही पूर्ववत करायला आपण तयार नाही. माणसं यापुढे हायब्रिड आयुष्यच जगणार आहेत असं मानलं तरीही ज्या गोष्टी सहज ऑफलाईन होणं शक्य आहे त्या ऑनलाईन करणं यातून आपणच आपल्याला चुकीच्या सवयीच्या बेड्या ठोकून घेतो. उदा. करोना काळात जेव्हा शाळा ऑनलाईन गेल्या तेव्हा मुलांना सोयीसाठी गृहपाठ_हरीरर्रि वर दिला जायचा. अनेकदा इंटरनेट कमकुवत असायचे, ऑनलाईन शाळा मुलांना करायची सवय नव्हती त्यामुळे या गोष्टी करणं भाग होतं. पण शाळा परत ऑफलाईन सुरु झाल्यानंतरही या गोष्टी आजही अनेक शाळांमध्ये सुरु आहे. आजही गृहपाठ मुलांना शाळेत न देता_हरीरर्रि वर किंवा शाळेच्या वेबसाईटवर दिला जातो. हे दिसायला कितीही सोयीचं आणि फॅन्सी दिसत असलं तरी मुलांमध्ये जी कौशल्ये विकसित होण्याची गरज असते ती अशा गोष्टींमुळे आपण मारून टाकतो. आता गृहपाठाचेच उदा. घेऊया. शाळेत गृहपाठ जेव्हा दिला जातो तेव्हा तो लिहून घेणं, व्यवस्थित लिहून घेणं, किंवा शिक्षकांनी सांगितलेल्या सूचना नीट समजून घेणं, त्याप्रमाणे गृहपाठ पूर्ण करणं ही सगळी जीवन कौशल्ये आहेत. जेव्हा मुलांना आयता गृहपाठ मिळतो तेव्हा यातली अनेक कौशल्ये वजा होऊन जातात. गृहपाठ हे फक्त वह्या भरण्याचे काम नाहीये. दुसरं कामाच्या निमित्ताने हे अनेकदा जाणव-ले आहे की शाळेतून मिळालेला ऑनलाईन अभ्यास, गृहपाठ बघण्यासाठी म्हणून मुलं पालकांकडे मोबाईल मागतात (जर त्यांच्याकडे स्वतःचा मोबाईल नसेल तर), जर त्यांच्याकडे त्यांचा स्वतःचा मोबाईल असेल तर त्यात डोकं घालून बसतात. गृहपाठ बघणं ही पाचसात मिनिटांची फारतर फार गोष्ट असते पण हातात मोबाईल आला की रील्स बघत बसणं, गेमिंग करत बसणं या गोष्टी सुरु होतात आणि त्यात वेळ जायला लागतो.

अशा अनेक गोष्टी अधोरेखित करता येतील. मुळात मुद्दा हा आहे की शालेय मुलांच्या संदर्भात अनेक जीवन कौशल्ये विकसित होत असतात, पण ज्या गोष्टी ऑफलाईन शक्य आहेत त्याही ऑनलाईन केल्यामुळे हा जीवनकौशल्य विकास आपण मारून टाकतो. सतत गेमिंग किंवा चॅटिंग करणाऱ्या मुलांमध्ये नजरेला नजर न देता येण्याची समस्या मी अनेकदा बघितली आहे. या मुलांना समोरच्या व्यक्तीशी नजरेला नजर देऊन बोलता येत नाही. त्यांची नजर सतत भिरभिरत असते कारण अशा संवादाची त्यांची सवयच मोडून जाते. टीव्ही आला तेव्हापासून मोठ्यांच्या जगाने त्यांच्या सोयीसाठी मुलांना टीव्हीसमोर बसून जेवायची सवय लावली होती. त्या पिढीच्या मुलांना मुलं झाल्यावर ती सवय मोबाईल बघत जेवण्याकडे वळली आहे. या सगळ्यात मुलांचं विविध स्तरीय नुकसान होतं पण याबाबत तेव्हाही पालक निष्काळजी होते, आजही पालक निष्काळजी आहेत. पण जेव्हा मामला फक्त टीव्ही पुरता मर्यादित होता तेव्हा तो टीव्ही कधीतरी बंद होत होता, आता मोबाईल २४/७ आपल्या खिशात आणि मुलांच्या हातात आहे अशा-वेळी मोठ्यांच्या जगाने निष्काळजीपणा दाखवून चालणार नाही.

तुमचा मोबाईल, टॅब, लॅपटॉप आणि टीव्ही यांचा वापर मिळून तुमचा दिवसाचा स्क्रीन टाईम ठरतो. त्यामुळे तो किती असावा असा विचार जेव्हा कराल, तेव्हा या सगळ्याचा एकत्रित विचार आवश्यक आहे. कशासाठी स्क्रीन वापरात आहात, तुमचा हेतू काय आहे, याची स्पष्ट कल्पना असायला हवी. अनेकदा निर्हेतुक आणि उगीचच सतत मोबाईल बघितला जातो. त्यामुळे स्क्रीनसमोर वेळ देण्यामागचा उद्देश स्पष्ट हवा. अति स्क्रीन टाईममुळे शारीरिक आणि मानसिक समस्या तयार होतात. झोपेच्या समस्या, पाठदुखी, डोळ्यांच्या समस्या, डोकेदुखी अशा प्रकारच्या शारीरिक समस्या निर्माण होतात. नैराश्य, अस्वस्थपणा, रागीटपणा, सतत उदास वाटणं अशा स्वरूपाच्या मानसिक समस्याही उद्भवतात. तर मुलांच्या आकलन कौशल्यावरही अति स्क्रीन टाईमचा परिणाम होतो. एखाद्या गोष्टीचं आकलन, विचार करणं, विश्लेषण करणं, वाचन, भाषा, स्मृतीवरही अनेकदा अति स्क्रीन टाईमचा परिणाम होतो. मुलांच्या संदर्भात एकाग्रता नष्ट होणं, लक्ष न लागणं, सलगपणे एखादी गोष्ट करता न येणं अशा अनेक समस्या उद्भवू शकतात, हे लक्षात घेतलं पाहिजे.

स्क्रीन टाइम किती हवा, यापेक्षाही आपल्याला सतत मोबाईल लागत नाही हे मान्य करणं आताच्या घडीला अत्यावश्यक आहे. मोबाईल आपण कशासाठी वापरायचा, कशासाठी वापरायचा नाही या डिजिटल विवेकाचा भाग आहे. त्यावर मोठ्यांच्या जगाने गांभीर्याने विचार करायला हवा.

# ज्ञानरूपी ऊर्जेचा खळखळता स्त्रोत....- डॉ. श्रद्धा मिसर अवस्थी.

महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील अत्यंत अभ्यासू, ज्ञानदानाची अतिव आवड असणाऱ्या, निखळ, सहज, मनमोकळेपणाने सर्वांशी गप्पा मारणाऱ्या, स्पष्ट वक्त्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, महाविद्यालयातील कार्यक्रम म्हणजे त्यांची हजेरी असणारच, अशा सर्वांच्या लाडक्या डॉ. श्रद्धा मिसर-अवस्थी मॅडम यांचे व्यक्तिमत्व वाखाणण्याजोगे असे आहे.

गेल्या ३१ वर्षापासून ज्ञानदानाचे अविरत कार्य करत त्यांची नाळ महाविद्यालयाशी जोडून राहिली आहे. इंग्रजी सारखा अत्यंत अवघड विषय ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या पद्धतीने शिकविणे हीच त्यांची आवड आहे. त्यांचा वर्ग १२० विद्यार्थ्यांनी खचाखच भरलेलाच असायचा. तरीही प्रत्येक विद्यार्थ्यांची इंग्रजीची वही ते तपासल्याशिवाय राहायचे नाहीत हीच त्यांची दैनंदिनी आहे.

कौटुंबिक पार्श्वभूमी.

जळगाव वाशी मॅडम खानदेश कन्या आहेत. त्यांचे सासर विदर्भातील वाशिम हे आहे. म्हणजे त्या विदर्भाच्या स्नुषा आहेत. तर त्यांची कर्मभूमी मराठवाड्यातील लातूर ही राहिली आहे. म्हणजे खानदेश, विदर्भ, मराठवाडा असा त्रिकोण त्यांनी उत्तमरीत्या सांधला आहे.

त्यांचे वडील शिक्षक व मुख्याध्यापक राहिलेले आहेत. आई सुगृहिणी होत्या. घरात आत्या, काकू, काका सर्व सुशिक्षित असल्याने लहानपणापासूनच त्यांना वाचन, लेखन, राजकारण, समाजकारण, चर्चा, भाषण यांचे धडे मिळालेले आहेत. त्यांनी चौथीत असतानाच मृत्युंजय, ययाती अशा कादंबऱ्या वाचून काढलेल्या आहेत. एका प्रगल्भ, सुज्ञ अशा वातावरणातून त्यांचे बालपण घडलेलं आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विवाहा नंतर त्या लातूरला आल्या आणि इथेच त्या रमल्या. नंतर महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हीच त्यांची कर्मभूमी राहिली.

शैक्षणिक प्रवास.

डॉ. श्रद्धा अवस्थी मॅडम यांनी दहावी नंतर इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग चा त्य डिप्लोमा केला पण त्यांना शिकविण्याची आवड असल्याने त्यांनी एम. ए इंग्लिश, एम. ए मराठी व बी.एड करून शैक्षणिक क्षेत्रात पदार्पण केले.

जुलै १९९२ मध्ये महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये त्या इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून रुजू झाल्या. त्या स्वतः हिंदी भाषिक असतानाही व ग्रामीण पार्श्वभूमी नसतानाही त्यांनी शंकर पाटलांच्या ग्रामीण साहित्यावर एम. फिल व पी.एच.डी ही पदवी प्राप्त केली.

स्नेहसंमेलन समिती व विद्यार्थी संसद समिती.

डॉ. श्रद्धा अवस्थी यांचे वक्तृत्व कौशल्य हे अंगभूत गुण असल्याने त्या महाविद्यालयात आल्यापासून ते आज तागायत त्यांच्याकडे स्नेहसंमेलन व विद्यार्थी संसद या दोन्ही समित्या होत्या. महाविद्यालयातील गॅदरिंग चे सर्व कार्य त्या अत्यंत आनंदाने, आवडीने करतात. शेलापागोटे निवड, वाचन, विद्यार्थ्यांना कविता, शेरोशायरी च्या माध्यमातून हसविणे, नाचविणे हे त्यांना सहज जमते. त्यांच्या भाषा प्रभुत्वामुळे व हजरजबाबीपणा मुळे विद्यार्थी संसदेतील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणे, महाविद्यालयातील विद्यार्थिनींना योग्य दिशा दाखविणे, प्रसंगी रागावणे, आवाज मोठा काढून त्यांना थांबविणे यामुळे त्या विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रिय राहिलेल्या आहेत.

उत्तम सूत्रसंचालन.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये आतापर्यंत आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स व नॅशनल कॉन्फरन्स विविध विषयात झालेले आहेत भूगोल, फिजिक्स, इंग्लिश, गांधीयन स्टडीज, राष्ट्रीय चर्चासत्रे, याप्रसंगी मॅडमनी इंग्रजी व मराठीतून उत्तम सूत्रसंचालन केले आहे. सोबतच विद्यार्थ्यांना सूत्रसंचालन करण्यासाठी मार्गदर्शनही केले आहे. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे वेबसाईट तयार करताना माहिती संकलन व इंग्रजीमध्ये संहिता लेखन करण्यात मॅडमचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे.

विद्यार्थी कल्याण मंडळाचे उद्घाटन असेल, पालक मेळावा असेल की गॅदरिंगच्या वेळी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम असेल मॅडम सूत्रसंचालनाच्या टेबलवर विद्यार्थ्यांसोबत कायम बसलेल्या असायच्या.

इंग्रजी विषयावर प्रभुत्व.

इंग्रजीच्या त्या उत्तम शिक्षिका राहिल्या आहेत. सोबत प्रत्येक वर्षी एक्झामिनर, मॉडरेटर याही भूमिका त्यांनी उत्तम रीतीने पूर्ण केले आहेत. ट्रेनिंग सेंटर मध्ये रिसोर्स पर्सन, पेपर सेटर व इंग्रजीच्या अभ्यासक्रमाचे पुस्तक परीक्षण ही त्यांनी केले आहे. वाचन हा त्यांचा मुख्य छंद असल्याने व वाचनाची आवड असल्याने वाचनाचा वेग ही त्यांचा मोठा राहिलेला आहे.

त्यांची ग्रंथसंपदा.

डॉ. श्रद्धा यांनी आतापर्यंत १९ पुस्तकांचे प्रकाशन केले आहे. गेल्या पंधरा वर्षापासून त्यांचे लेखन कार्य चालू असून आज तागायत ते त्यात रमलेले दिसतात. अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सिम्पलीफाइड इंग्लिश हे मार्गदर्शन पुस्तक त्यांनी विद्यार्थ्यांच्या हाती कायमचे दिले आहे. स्पोकन इंग्लिश, टी ए आय टी, बँकिंग, एम बी ए एंट्रन्स, एमपीएससी व यूपीएससी व इतर सर्व परीक्षांना उपयुक्त असे इंग्रजीची पुस्तके त्यांनी विद्याभारती प्रकाशनच्या माध्यमातून मार्केटमध्ये आणलेले आहे. सोबतच इंग्रजीचे पॉकेट डिक्शनरी, व्हर्ब ऍडजेक्टिव्ह डिक्शनरी हेही मार्केटमध्ये उपलब्ध आहेत.

स्वतंत्र प.

इंग्लिश विथ अवस्थी मॅम

नावाचे यूट्यूब चैनल मॅडम गेल्या दोन वर्षापासून चालवत आहेत. आतापर्यंत त्यांचे ९० व्हिडिओज त्यांनी अपलोड केलेले आहेत. याच नावाचे स्वतंत्र प त्यांनी तयार केला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा त्यांचा सेवानिवृत्तीनंतरचा मानस आहे.

मॅडमचे वेगळेपण.

मॅडमचे व्यक्तिमत्व बहिर्मुखीआहे. मनात कुठलीही कल्पना न ठेवता सहज त्या समोरच्या व्यक्तीशी संवाद साधतात. पोटात एक ओठात एक असे त्यांच्या बाबतीत नाही. खळखळून हसणे, सतत हसमुख चेहरा, त्यांच्या येण्याने वातावरण बदलून टाकण्याची क्षमता त्यांच्यात आहे. निर्भीडपणा, सडेतोडपणा, दुसऱ्यांचे भरभरून कौतुक करणे, कोणतीही गोष्ट न लपवून ठेवणे, जिज्ञासू वृत्ति, सत्याची कास धरणे, सतत नव्या नव्या गोष्टी शिकत राहणे, इतरांबद्दल सकारात्मक राहणे हे त्यांचे वेगळेपण सर्वांना जाणवते.

महाविद्यालयातील प्रत्येक प्राचार्यांशी अत्यंत नम्रतेने व सहकार्याने ते वागलेले आहेत. कोणत्याही पदाचा त्यांनी कधी हव्यास बाळगला नाही. त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत कार्यक्षम रीतीने त्यांनी पूर्ण केली आहे.

गेली ३१ वर्ष त्या महाविद्यालयाशी, विद्यार्थ्यांशी, महाविद्यालयातील प्रत्येक उपक्रमाशी व येथील दगड मातीशी त्या एकरूप झालेल्या आहेत.

सुशिक्षित परिवार.

डॉ. श्रद्धा मिसर अवस्थी यांचा परिवार अत्यंत सुशिक्षित व सुसंस्कारित आहे. त्यांचे पती डॉ. राजेंद्र अवस्थी हे रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालय येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड २०२२ चा त्यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार त्यांना मिळाला आहे. त्यांचे चिरंजीव डॉ. वेदांत अवस्थी, हे लातूर येथील विख्यात नोबल हॉस्पिटलमध्ये एमडी फिजिशियन आहेत तर स्नुषा डॉ. आकांक्षा या सुद्धा डॉक्टर असून त्या जॉब करतात. त्यांना चिरंजीव अक्षांत हा गोंडस नातू आहे. असा उत्तम, कार्यक्षम, सुज्ञ व सुशिक्षित असा परिवार मॅडमनी तयार केला आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील कार्यात गेली ३१ वर्ष अत्यंत यशस्वी रीतीने वाटचाल करत डॉ. श्रद्धा यांनी आपली वयाची ५८ वर्षे पूर्ण करून येत्या ३१ ऑगस्टला सेवानिवृत्त होत आहेत. वास्तविक पाहता आजही नवीन माध्यमे हाताळण्याची त्यांची आवड, नवीन शिकण्याची त्यांची जिद्द त्यांना स्वस्थ बसू देणार नाही हे सत्य आहे.

फक्त महाविद्यालयातील कार्य बाहुल्यातून होत असलेल्या त्यांच्या निवृत्तीबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

असा हा ज्ञानरूपी ऊर्जेचा खळखळता स्त्रोत याची उणीव त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर महाविद्यालयाला भास ल्याशिवाय राहणार नाही. मॅडमला उदंड आयुष्य, निरोगी जीवन मिळो व त्यांची राहिलेली स्वप्न पूर्ण होवो.

हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

लेखिका
डॉ. उमा कडगे मिरजगावे
लातूर
मोबाईल ९४ २२१ ८१ ५९७

## माझे आदरणीय गुरुवर्य ..डॉ श्रद्धा अवस्थी.

ऍड .कामिनी स्वामी.
धाराशिव

अकरावी वर्गाचा माझा पहिला दिवस होता . तिसरा तास इंग्लिश विषयाचा होता. हा विषय कोण शिकवणार याची उत्सुकता होती. सडपातळ बांध्याच्या चष्मेवाल्या एक गोऱ्या मॅडम आल्या आणि म्हणाल्या ' मी श्रद्धा अवस्थी तुमची इंग्लिश ची टीचर '.

मुलांचाही परिचय झाला. त्या दिवशी जाता जाता मॅडम म्हणाल्या. उद्यापासून इंग्लिश चे पुस्तक नाही आणले तर तुम्हाला क्लासच्या बाहेर उभे राहावे लागेल. याची प्रचिती दुसऱ्या दिवशी आलीच. मॅडम मुळे आम्हाला शिस्त लागली की त्या त्या विषयाची पुस्तकं आपल्याजवळ असलीच पाहिजेत.

दिवस सरले. वर्ग वाढत गेले. फर्स्ट इयरला येईपर्यंत मॅडम कधी आई तर कधी मैत्रीण होऊ लागल्या.' रिफंड ' असेल किंवा ' ' सॉलिटरी रिपर 'आजही तेवढ्याच लक्षात आहे. सेकंड इयरला असताना वक्तृत्व स्पर्धेचा विषय होता स्त्री सबलीकरण. मॅडमशी चर्चा करताना मॅडम म्हणाल्या माझा मुलगा बारावीला आहे मला वाटतं शेवटची ट्युशन संपवून तो सातच्या आत घरात यावा. जे नियम मुलींसाठी आहेत तेच नियम मुलांसाठी सुद्धा असावेत. जर मुलं काही धाडसी काम करत असतील तर ते मुलीसाठीही असावेत. हे स्त्री सबलीकरणासाठी पहिलं पाऊल असेल. आज मॅडमची ही शिकवण मी माझ्या आयुष्यात माझ्या मुलांसाठी वापरते.

एक शिक्षक अनेक पिढ्या घडवतो ते हेच असावे बहुतेक. २००४ नंतर कॉलेज संपलं पण मॅडमचा सहवास नाही संपला. आम्हा मित्र मैत्रिणींमध्ये मॅडमचा विषय असतोच. परवा आमच्या बॅच चे गेट-टुगेदर झाले. मॅडम आल्या त्यांना बघून वाटलं . आम्ही वीस वर्ष पुढे गेलो. पण मॅडम मात्र आहे तिथेच आहेत. त्यांचा तोच उत्साह, तेच हास्य, तेच बोलणं, तोच निखळपणा, मॅडमची ती जवळीकता आम्ही पुन्हा एकदा अनुभवली. त्यादिवशी मी मॅडमचा सत्कार केला तो क्षण माझ्यासाठी माझ्या आयुष्यातला अविस्मरणीय क्षण होता.

मॅडमनी केलेले अनमोल ज्ञानदान यासाठी आम्ही सर्व विद्यार्थी कायम त्यांच्या ऋणात राहू इच्छितो.

मॅडम ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त होत आहेत. ३१ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतरची ही रिटायरमेंट बुद्धीला पटते पण मनाला पटत नाही. एक शिक्षिका जी नेहमी आई होत गेली ती कशी बर रिटायर होईल? आता तर मॅडमनी ज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा संगम करत ऑनलाइन क्लासेस सुरू केले आहेत. बऱ्याचशा पुस्तकांचे प्रकाशनही झाले आहे. हे रिटायरमेंट फक्त नावालाच आहे. मॅडम आणखी तुमचे विद्यार्थी असेच घडत राहतील. आपली नाती अशीच घट्ट होत राहतील. आम्ही खरंच भाग्यवान आहोत ज्यांना तुमच्यासारखे शिक्षक मिळाले. ईश्वर तुम्हाला उदंड आयुष्य देवो.



हीच ईश्वरचरणी प्रार्थना. धन्यवाद.

एड. कामिनी स्वामी .धाराशिव

# गौतमबुध्दाचे तत्वज्ञान अण्णाभाऊंनी त्यांच्या साहित्यातून मांडले - प्रा. संजय शिंदे यांचे प्रतिपादन





रेणापूर / प्रतिनिधी : – अण्णाभाऊंनी आफाट साहित्याची निर्मीती केली. त्यांचा कथा, कादंबऱ्या, नाटके,पोवाडे, वगनाट्ये आणि अन्य साहित्यातून तथागत गौतम बुद्धांचे तत्वज्ञान मांडले आहे. त्यांच्या कांदंबरीतील सर्व नायक – नायिका स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायासाठी लढताना दिसतात .एवढेच नव्हे तर त्यांच्या साहित्यातील प्रत्येक पानावर विवेक आणि विज्ञानवाद आढळतो. आज समाजाला याच विचाराची गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यीक आणि वक्ते महाराष्ट्र शासनाच्या अण्णाभाऊ साठे चरित्र – साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव प्रा.डॉ. संजय शिंदे यांनी केले आहे.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमीत्त महिनाभर लातूर जिल्ह्यात दि. १ ऑगष्ट ते ३१ ऑगष्ट पर्यंत चालविण्यात येत असलेल्या बहुजन प्रबोधन जागर अभियान चे रेणापूरमध्ये आगमन झाले. यावेळी झालेल्या जाहिर सभेत प्रा.डॉ. संजय शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी रेणापूर चे सामाजिक कार्यकर्ते दादाराव कांबळे होते.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात प्रा. शिंदे पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जग बदलण्याचा दिलेला संदेश आपण स्वतःच्या शिरावर घेतला असल्याचे अण्णाभाऊ सांगतात. म्हणून डॉ.आंबेडकरांचा वैचारिक वारसा चालविण्याची जबाबदारी अण्णाभाऊंना माणणाऱ्या लोकांवर आलेली आहे.डॉ. आंबेडकरांनी भारताला दिलेली लोकशाही आणि संविधान आज धोक्यात आले असताना अण्णांभाऊंचा वारसा सांगणारे गप्प का आहेत ? असा सवाल उपस्थित केला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस बहुजन प्रबोधन जागर अभियानात सहभागी झालेले कार्यकर्ते प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे, प्रा.मकबूल शेख, नरसिंग घोडके आणि जयदिप आगलावे यांचा रेणापूरवासीयांच्या वतीने स्वागत करून सत्कार करण्यात आला. या सत्कारमूर्ती कार्यकर्त्यानी अभियान काळात लातूर जिल्ह्यातील नऊ तालूक्यात त्यांना आलेला अनुभव कथन केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. किशन कुडके यांनी केले. सूत्रसंचलन फकिरा ब्रिगेडचे तालूका प्रमुख संजय विरूळे यांनी केले तर ' लसाकम ' चे तालूकाध्यक्ष जगन्नाथ येमले यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, महिला, पुरुष आणि कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ लातूर हॉरीझॉनच्या वतीने लातुरात कापडी पिशव्यांचे वाटप

लातूर : पर्यावरणाच्या संवर्धन व संरक्षणाच्या उद्देशाने प्लास्टिक मुक्त अभियानांतर्गत रोटरी क्लब ऑफ लातूर हॉरीझॉनच्या वतीने लातुरात कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ लातूर हॉरीझॉनचे अध्यक्ष रो. विश्वनाथ स्वामी सावळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकाराने प्लास्टिक मुक्त लातूरच्या अनुषंगाने हा आगळा वेगळा उपक्रम राबविला जात आहे. यासंदर्भात आपले मनोगत व्यक्त करताना रोटरी क्लब ऑफ लातूर हॉरीझॉनचे अध्यक्ष रो. विश्वनाथ स्वामी सावळे म्हणाले की, पर्यावरणाच्या संरक्षणाची जबाबदारी प्रत्येक जागरूक नागरिकांची आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचा किती मोठा ह्रास होतो हे आता लोकांना वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. तरीही लोक दैनंदिन खरेदीसाठी प्लास्टिकच्याच पिशव्यांचा वापर करताना दिसतात. ही बाब पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत घातक असल्याने लोकांना त्यापासून परावृत्त करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांचे प्रबोधन व्हावे यासाठी आपण व आपले सहकारी सातत्याने प्रयत्नशील असून वेगवेगळ्या शाळा – महाविद्यालय, भाजी विक्रीच्या ठिकाणी जाऊन पर्यावरणाचे महत्व विशद केले जात आहे. हा उपक्रम केवळ लातूर शहरातच नव्हे तर जिल्हाभरात



राबविण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. हा उपक्रम हाती घेतल्यापासून अनेकांच्या हाती आता प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्या दिसत आहेत. हे एक प्रकारे या अभियानाचे यशच असल्याची भावना व्यक्त करून ज्येष्ठांसह नागरिकांनी स्वतःही प्लॅस्टिकच्या वापरापासून दूर रहावे व समाजातील विविध घटकातील लोकांनाही त्यासाठी प्रवृत्त करावे असे आवाहन विश्वनाथ सावळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

## अण्णाभाऊ च्या साहित्याचा केंद्रबिंदू 'माणूस' असून त्यांचे समाधान ''आंबेडकरवादच आहे. यु.डी.गायकवाड

लातूर :– अण्णाभाऊ साठे यांनी निर्माण केलेले साहित्य हे वास्तववादी असून त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू 'माणूस,' आहे आणि त्यांचे लक्ष माणूस ज्या दुःखामुळे ग्रासलेला आहे .त्या दुःखापासून त्यांची मुक्ती करणे होय. अण्णाभाऊंनी आपली सर्वोत्कृष्ट साहित्यकृती मार्क्सला ,माओला, किंवा लेनिनना अर्पित केली नाही तर ती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अर्पित केली.अर्थातच ते 'वर्गाच्या' समोर जाऊन 'जाती वर्ग 'अधर्माची ब्राह्मणवादी समस्येचे समाधान आंबेडकरवादच आहे.असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक तथा महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे राज्य सचिव यु.डी.गायकवाड यांनी केले .ते कर्नाटक मध्ये भालकी तालुक्यातील वांजरखेडा येथे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०३ वी जयंती खूप मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली .या प्रसंगी ते विचार पिठावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी नागनाथ बगदुरे हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र विकास आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बसवंतप्पा उबाळे हे होते. उबाळे यांनी ही अण्णाभाऊंच्या कथा कादंबऱ्या व त्यांची जाती–धर्माविषयी भूमिका मांडली. विचार पिठावर सरोजित




संगणाळकर ,रवी गायकवाड, महिंद्र कांबळे ,नागनाथ बोलसुरे, सिराज पटेल ,अजय सूर्यवंशी असे सामाजिक, राजकीय, धार्मिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते ,पुढे यु.डी. सर म्हणाले की, मातंग बांधवांनी 'आंबेडकरवाद' स्वीकारून बुद्ध विचाराकडे वळले पाहिजे ,तरच खऱ्या अर्थाने मातंग समाजाची वैदिक धर्माच्या गुलामीतून मुक्त होऊन ते आपली प्रगती साधू शकतील. कार्यक्रमाला पुरुष ,महिला, नागरिक प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष दीपक जाधव ,मुकेश गायकवाड, विजय कांबळे ,गोविंद गायकवाड, पांडुरंग कांबळे, उत्तम कांबळे, दयानंद जाधव, ज्ञानेश्वर कांबळे ,रमेश गायकवाड, अर्जुन कांबळे ,मनोज कांबळे, लखन गायकवाड ,रतन कांबळे, योगेश कांबळे, बळीराम कांबळे, व त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार बजरंग कांबळे यांनी केले.
.

# गणेशोत्सव स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी १५ सप्टेंबरपर्यंत सहभाग नोंदवावा सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन

मुंबई, दि. ३० : राज्य शासनाने १९ सप्टेंबर २०२३ पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

या स्पर्धेसाठी मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या जिल्ह्यांतून प्रत्येकी ३ व अन्य जिल्ह्यांतून प्रत्येकी एक या प्रमाणे उत्कृष्ट ४४ गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यात येईल. या ४४ गणेशोत्सव मंडळांमधून राज्यातील पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास पाच लाख रुपयांचे, द्वितीय क्रमांकास अडीच लाख रुपयांचे, तर तृतीय क्रमांकास एक लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. उर्वरित ४१ गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल. उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेचे वेळापत्रक उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गणेश मंडळांना १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत स्पर्धेत अर्ज करता येईल. ।रहींरीं.श्रिवर.सारळश्र.लो या ई – मेलवर गणेशमंडळांनी अर्ज करावा. पु. ल. देशपांडे कला अकादमी तर्फे ई–मेलवर प्राप्त अर्ज संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाला १८ सप्टेंबरपर्यंत परीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. १९ ते २८ सप्टेंबर दरम्यान जिल्हास्तरीय समितीचे सदस्य स्पर्धेत सहभागी गणेशोत्सव मंडळांचे प्रत्यक्ष भेटी देऊन परीक्षण करतील. व्हिडिओग्राफी आणि कागदपत्रे तपासून अभिप्रायासह गुणांकन करतील. जिल्ह–ास्तरीय समिती जिल्ह्यातून एका उत्कृष्ट गणेश मंडळाची शिफारस १ ऑक्टोबरपर्यंत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला करेल. राज्यस्तरीय समिती राज्यातील उत्कृष्ट ३ गणेश मंडळाची शिफारस अकादमीला करेल. त्यानुसार कला अकादमी विजेत्या मंडळांची घोषणा करेल व १२ ऑक्टोबरला विजेत्या गणेश मंडळांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल. राज्य शासनाच्या ु. ।रहरीरीहींर.र्सीं.ळप या संकेतस्थळावरील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या ४ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयात स्पर्धेचा तपशील, स्पर्धा निवडीचे निकष नमूद केले आहेत. तसेच अर्जही उपलब्ध करून देण्यात आला आहे. अर्जाच्या या नमुन्यानुसार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पु. ल. देशपांडे, महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या ।रहींरीं.श्रिवरसारळश्र.लो या ई– मेल १५ सप्टेंबर २०२३ पर्यंत अर्ज करावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी सहभाग नोंदवावा, असेही आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केले आहे.

## समाज कर्याबध्दलचा नंदकुमार बोडके यांना डॉ. बी. आर.आंबेडकर इंटरनॅशनल अवॉर्ड २०२३ प्रदान

अहमदपूर :– अहमदपूर तालुक्यातील वळसंगी येथील विद्यमान सरपंच नंदकुमार बोडके यांना युनिव्हर्सिटी ऑफ तोलोसा मेक्सिको अमेरिका चा डॉ बी. आर.आंबेडकर इंटरनॅशनल अवॉर्ड २०२३ हा २६ ऑगस्ट २०२३ रोजी बीदर येथे डॉ. व्ही कट्टबोमन (तोल–ोसा युनिव्हर्सिटी डाय रेक्टर), समाजकल्याण अधकारी प्रेमसागर दांडेकर,प्रा.सुमन भोसले यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. व्ही कट्टबोमन तर प्रमुख पाहुणे म्हणून बीदर जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रेमसागर दांडेकर, प्रा. सुमन भोसले, शेख जाकिर हुसेन(महाराष्ट्र राज्य सम्वयक),रमेश बीगावकर (कर्नाटक राज्य सम्वयक), सोपान तंदलवार (तेलंगणा राज्य सम्वयक)उपस्थित होते

नंदकुमार बोडके यांनी कॉलेज पा–सूनच राष्ट्रीय सेवा योजना (छड्ड) च्या माध्यमातून समाजसेवेला सुरवात केली आणि कर्मवीर




भाऊराव पाटील सेवा भावी संस्था,सानेगुरुजी कथामाला,बचपन बाचाव आंदोलन, स्वराज, सूर्या सेवाभावी संस्था,दिशा केंद्र,पोकरा यांच्या माध्यमातून वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमातून समाजसेवा केली. त्यात ग्रामस्वचछता अभियान,साक्षरता अभियान,दारू बंदी,व्यसनमुक्ती साठी कार्यक्रम,रक्तदान शिबिराचे आयोजन व रक्तदान,हुंडाविरोधी चळवळ साठी पथनाट्ये सादरीकरण, वृक्षा रोपण करणे,कुष्ठरोग निर्मूलन जाणीव जागृती करणे, पोकरा च्या माध्यमातून मृदसंधारन व जलसंधारण कामाची माहिती देणे,बालकामगारांना कामावरून सोडवून शिक्षणाच्या प्रवाहात अनाने, पोलिओ जाणीव जागृती करणे व लसीकरणास मदत करणे, निरंतर शिक्षण केंद्र चालवणे,गणेश उत्सव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीत सहभागी होऊन समाज प्रबोधनपर उपक्रम व कार्यक्रम घेणे. तसेच वैयक्तिक कामासाठी मदत करणे.इत्यादी सामाजिक कामे आत्तापर्यंत करत आल्यामुळे डॉ. बी. आर. आंबेडकर इंटरनॅशनल अवॉर्ड २०२३ देऊन नंदकुमार बोडके यांना गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल एल आय सी विकास अधिकारी एन. आर. चीलकावार, उपसरपंच बालासाहेब येरमे, सदस्य समद सय्यद,ग्रामसेवक सचिन तावरे,प्रकाश देशमुख, सतीश सिनगारे,बळीराम पीचारे,संतोष येरमे,शिवाजी जाभाडे यांच्या सह गावकरी व मित्र परिवार यांच्या कडून अभिनंदन होत आहे.

## लातूर जिल्ह्यातील मध्यम, लघु पाटबंधाऱ्यातील पाणी राखीव ठेवण्याचे जिल्हाधिकारी यांनी काढले आदेश

लातूर दि. ३० ( जिमाका ) लातूर जिल्ह्यात ऑगस्ट २०२३ अखेर समाधानकारक पाऊस झाला नाही तसेच मान्सून मध्ये पावसाची प्रगतीही नसल्याने जिल्ह्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून जिल्ह्यातील सर्व मध्यम, लघु पाटबंधारे यातील पाणी राखीव ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी काढला आहे.

जिल्हयातील मध्यम व लघु प्रकल्पातील उपयुक्त आसलेल्या पाण्याच्या पातळी चा आढावा घेऊन संभाव्य पाणी टंचाई उद्भवू नये यासाठी दि.७.०९.२०१५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराद्वारे लातूर जिल्हयातील मध्यम व लघु प्रकल्पातील पाणीसाठे टंचाई कालावधी मध्ये केवळ पिण्याच्या पाण्यासाठी या आद–ेशाव्दारे आरक्षित करण्यात आले आहे.

या आदेशानुसार यंत्रणेच्या कार्यक्षेत्रातील सर्व पाणी साठे आरक्षित करण्यात आले आ–हेत, त्या प्रकल्पातील पाणीसाठा अनधिकृतपणे उपसा होणार नाही याची दक्षता पाटबंधारे विभागाने घ्यावी. त्या त्या पाटबंधारे क्षेत्रातील कार्यकारी अभियंता यांनी धरणातील पाणीसाठा सुरक्षित ठेवण्यासाठी दक्षता पथक नेमावे असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

एम.आय.डी.सी च्या पाण्यातही होणार कपात लातूर जिल्ह्यातील आणि शहरातील औद्योगिक क्षेत्रातही येणाऱ्या काळातील पाणी टंचाई लक्षात घेऊन पाणी कपात करण्याची सूचना संबंधित विभागाला दिली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE